**सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्रं. २ चा उलटतपास**

मी प्रतिज्ञापूर्वक शपथेवर सांगतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | : | मुक्ता निरंजन काळसर्पे |
| माझे वय | : | ४२ वर्षे |
| व्यवसाय | : | आशा वर्कर |
| राहणार | : | हिरापुर हमेशा, |

**उलटतपास आरोपीतर्फे श्री. व्ही. सी. पारधी यांच्यामार्फत सुरू:—**

१. हे म्हणणे खरे आहे की, मी कथीत घटनेच्याआधी आरोपीला ओळखत नव्हते. साक्षीदार सांगते की, मी त्याची आजी क्रांती भोरगडे हिला ओळखत होते. हिरापुर हे कवलेवाडा रोडवर आहे. हे म्हणणे खरे नाही की, चिखलावरून चांदपुर येथे जायचे असल्यास सितासावंगी खंदाळ हा रस्ता जवळचा पडतो. हे मला माहित नाही की, चांदपुरवरून बपेरा हे गाव ७ ते ८ कि. मी. अंतरावर आहे किंवा कसे.

२. मी दिलीप कडु याला ओळखते. तो माझेसोबतच्या आशाकर्ता यांचा भाउ आहे. हे म्हणणे खरे आहे की, भागरता भुतांगे व दिलीप कडु यांचेशी माझे चांगले संबंध आहेत. हे मला माहित नाही की, दिलीप कडु व त्याच्या मित्रांनी आरोपी हितेश याला मारले होते किंवा कसे. हे मला माहित नाही की, त्या कारणाने आरोपीने त्यांच्याविरूध्द तक्रार दाखल केली व त्यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. हे म्हणणे खरे नाही की, चिखला ते हमेशा या रस्त्यावर रहदारी असते.

३. पोलीसांनी मला आरोपीची ओळख करण्यासाठी पोलीस स्टेशनमध्ये बोलाविले होते.

**प्रश्न** : पोलीसांनी तुम्हाला ओळख परेडसाठी कथीत तक्रारीनंतर किती दिवसांनी बोलाविले?

**उत्तर** : आम्ही पोलीस स्टेशनला गेलो तेव्हा आरोपी तिथेच आलेला होता.

४. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही पोलीस स्टेशनला गेलो तेव्हा आरोपी तिथे बसलेला होता. हे मला माहित नाही की, माझ्या जाण्याच्याआधी आरोपीने दिलीप कडु व ईतरांविरूध्द तक्रार दिली होती किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात सांगितल्याप्रमाणे कोणतीही घटना घडलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीच्या गाडीवर कधीही गेले नाही.

५. हे म्हणणे खरे नाही की, दिलीप कडु हा माझा नातेवाईक आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्याने आरोपीला मारहाण केली व त्यामुळे आरोपीने त्याच्याविरूध्द तक्रार दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की, त्या तक्रारीच्या अनुषंगाने मी प्रस्तुत खोट्या स्वरूपाची तक्रार दिली. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला फसविण्याकरिता

आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास काही नाही.**

समक्ष
श्रवणोत्तर स्विकृत

स्वा/—
(श्रीमती पी.ए.राजपूत)
**न्यायदंडाधिकारी प्र.श्रेणी, तुमसर.**

तुमसर.
**दि. २३/०४/२०२४ .**